**नवी मुंबई महानगरपालिका**

**महापालिका सर्वसाधारण सभा**

महानगरपालिकेच्या शनिवार, दिनांक 17 फेब्रुवारी 2018 रोजी भरलेल्या माहे फेब्रुवारी 2018 महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01 दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | **इतिवृत्त** - दिनांक 20 डिसेंबर 2017 दिनांक 02 जानेवारी 2018 |
| **निर्णय** | **कायम** |
| **विषय क्र. 02 दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | **प्रश्नोत्तरे** |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 03 दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | ऐरोली से-15 येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या जवळील म.रा.वि.वि. कंपनी उपकेंद्र प्लॉट नं.12, से-14 येथे स्थलांतरीत करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./119/2018. |
| **ठराव क्र. 187 दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "ऐरोली से-15 येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या जवळील म.रा.वि.वि. कंपनी उपकेंद्र प्लॉट नं.12, से-14 येथे स्थलांतरीत करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 8 कोटी, 33 लाख, 41 हजार 193 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 04 दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | कोपरखैरणे सेक्टर 14 भूखंड क्र. 22 येथे नागरी आरोग्य केंद्र बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./103/2018. |
| **ठराव क्र. 188. दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "कोपरखैरणे सेक्टर 14 भुखंड क्र. 22 येथे नागरी आरोग्य केंद्र बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 2 कोटी, 67 लाख, 09 हजार 360 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 05 दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | महापालिका मालकीच्या मालमत्तांवर युनिपोल होर्डींग, गॅन्ट्री, पादचारी पुल(एफओबी), ब्रीज पॅनलवरील जाहिराती, फ्री स्टॅंडींग युनिट उभारणे, त्यापासून महापालिकेस उत्पन्न देणे, परिसराचे सुशोभिकरण करणे, निगा व देखभाल दुरुस्ती करणे यासाठी 07 वर्षे कालावधीसाठी खाजगी सार्वजनिक सहभाग (Public Private Partnership) या तत्वावर जाहिरातीचे हक्क देऊन विकसित करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 19/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/परवाना विभाग/154/2018. |
| **ठराव क्र. 189. दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "महापालिका मालकीच्या मालमत्तांवर युनिपोल होल्डींग, गॅन्ट्री, पादचारी पुल (एफओबी), ब्रीज पॅनलवरील जाहीराती, फ्री स्टॅंडींग युनिट उभारणे, त्यापासून महापालिकेस उत्पन्न देणे, परिसराचे सुशोभिकरण करणे, निगा व देखभाल दुरुस्ती करणे यासाठी Public Private Partnership (PPP) तत्वावर ई-निविदा प्रकियेद्वारे जाहीरातीचे हक्क 07 वर्षाच्या कालावधीसाठी खाजगी जाहीरात एजन्सीस देणे व तद्नंतर जाहीरात माध्यमे महापालिकेस हस्तांतर करणे व जाहीरात एजन्सीमार्फत कामे करुन घेणेबाबतच्या तसेच जाहिरात माध्यमांच्या |

| | |
|---|---|
| | संख्येत परिस्थितीनुरुप घट/वाढ करणेचे अधिकार मापालिका आयुक्त यांना देणेबाबतच्या धोरणात्मक प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 79(क) नुसार, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 06 दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | वाशी सेक्टर 16ए येथील अग्निशमन केंद्र ते सेक्टर 15 येथील विभाग कार्यालय पर्यंत मुख्य रस्त्यालगत असलेल्या स्टॉम वॉटर ड्रेन व फुटपाथचे बांधककाम करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 19/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./124/2018. |
| **ठराव क्र. 190. दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "वाशी सेक्टर 16ए येथील अग्निशमन केंद्र ते सेक्टर 15 येथील विभाग कार्यालय पर्यत मुख्य रस्त्यालगत असलेल्या स्ट्रॉम वॉटर ड्रेन व फुटपाथचे बांधकाम करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 2 कोटी, 82 लाख, 82 हजार 895 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 07. दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | घणसोली सेक्टर-6 येथील भुखंड क्रमांक 17 येथे महिला सक्षमीकरण केंद्र बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 19/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./125/2018. |
| **ठराव क्र. 191. दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "घणसोली सेक्टर-6 येथील भुखंड क्रमांक 17 येथे महिला सक्षमीकरण केंद्र बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 1 कोटी, 78 लाख, 59 हजार 285 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, सुधारीत प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 08. दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | तुर्भे से.23 जनता मार्केट येथील रस्त्यांची सुधारणा व S.W.Drain बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 19/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./126/2018. |
| **ठराव क्र. 192. दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "तुर्भे से. 23 जनता मार्केट येथील रस्त्याची सुधारणा व S.W.Drain बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 2 कोटी, 75 लाख, 04 हजार 829 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 09. दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी नवीन वाहने खरेदी करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 22/01/2018 चे पत्र क्र. जा.क्र./अग्नी मुख्यालय/वाशी/ 783/2018. |
| **ठराव क्र. 193. दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी नवीन वाहने खरेदी करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 9 कोटी, 05 लाख, 49 हजार 720 मात्र इतक्या खर्चास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचा कलम 73(क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 10. दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियमानुसार विभागीय चौकशीअंती डॉ. दिपक रामचंद्र परोपकारी, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-56(2)(क) मधील “समयश्रेणीतील खालच्या सहा टप्प्यांवर आणणे” ही प्रस्तावित शास्ती कायम करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 03/02/2018 चे पत्र क्र. जा.क्र.नमुंमपा/प्रशा/आस्था-6/प्र.क्र.फ-वै.धा./270/2018. |

| | |
|---|---|
| **ठराव क्र. 194.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "महारष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियमानुसार विभागीय चौकशीअंती डॉ. दिपक रामचंद्र परोपकारी, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 56(2)(क) मधील "समयश्रेणीतील खालच्या सहा टप्प्यांवर आणणे" ही प्रस्तावित शास्ती कायम करण्याच्या, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 11.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | नमुंमपा कार्यक्षेत्रात टायफॉईट कंज्युगेट व्हॅक्सीन (Typhoid Conjugate Vaccine) प्रकल्प राबविणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 05/02/2018 चे पत्र क्र. जा.क्र.नमुंमपा/आरोग्य/712/2018. |
| **ठराव क्र. 195.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "नमुंमपा कार्यक्षेत्रात टायफॉईड कंज्युगेट व्हॅक्सीन (Typhoid conjugate vaccine) प्रकल्प राबविणे, याकरिता आवश्यक लस जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशीनुसार मे. भारत बायोटेक या उत्पादकाकडून खरेदी करणेस व प्रकल्पाकरीता एकूण अपेक्षित खर्च रु. 625 लक्ष खर्च करण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |

**<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी</u>**

**माहे 17 फेब्रुवारी 2018 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 12 सेक्टर 02 येथील प्रिती सोसायटी रो हाऊस नं- 10 ते प्लॉट नं. 70 पर्यंत, तसेच सी 432 ते सी 565 पर्यंत व आरंभ सोसायटी रो. हाऊस नं. 01 ते रो हाऊस नं. 12 पर्यंत मेनलाईन, प्रितम सोसायटी रो. हाऊस नं-33 ते अभिनव रहाटे यांच्या घरापर्यंत व मिलिंद सोसायटी रो, हाऊस नं.1 ते रो हाऊस नं. 13 पर्यंत मेनलाईन, विशाल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं 18 ते साई सदन सोसायटी रो हाऊस नं-1 पर्यंत व ई 369 ते ई 456 अजिंक्य हॉस्पिटल दरम्यान तसेच श्री सिध्दि गणेश रो. हाऊस नं. 1 ते ई -356 पर्यंत, ई 356 ते प्लॉट नं. 32 पर्यंत, सी 347 ते प्रिती रो. हाऊस नं. 9 पर्यंत च्या सर्व सिडको कालिन मेन मलनि:स्सारण वाहिन्या त्वरीत बदलणे. | 12<br>फेब्रुवारी | 196<br>17/02/2018 | मंजूर |
| 2. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 12 सेक्टर 02 येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदयानातील मुख्य गेट वर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच माता रमाई चे भिंती रहीत तैल चित्र ज्या प्रमाणे ठाणे महानगरपालिका अंतर्गत दादोजी कोंडदेव स्टेडियम समोरील भिंती रहीत तैल चित्राच्या धरतीवर प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 येथे करणे. | 13<br>फेब्रुवारी | 197<br>17/02/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 12 सेक्टर 02 येथील जलवाहिन्या नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सन-2001 साली बदलण्यात आल्या होत्या. परंतु सदय स्थितित त्या जलवाहिन्या जीर्ण झालेल्या असून त्या गंजलेल्या अवस्थेत आहेत. तरी प्रभाग क्र. 12, सेक्टर-2 येथील कंडोनिअम अंतर्गत दोन इंचाच्या नविन जल वाहिन्या टाकणे. | 14<br>फेब्रुवारी | 198<br>17/02/2018 | मंजूर |
| 4. | **श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांच्या वैयक्तिक गृहनिर्माण कर्जाची मर्यादा वाढवून वेतनबँड क्रमांक-1 एस ते पी.बी. 1 यांच्याकरिता रू. 25 लाख, व वेतनबँड क्रमांक- पी.बी.-2 यांच्याकरिता रू. 30 लाख आणि वेतनबँड क्रमांक- पी.बी.-3 यांच्याकरिता रू. 35 लाख करुन व्याजदरात 1% ते 2% ने कपात करणे. | 15<br>फेब्रुवारी | 199<br>17/02/2018 | मंजूर |
| 5. | **श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**<br>महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांची रोस्टरप्रमाणे व शासन निर्णय क्रमांक:- 1215/394/प्र.क्र.16/15/नवि-28, दिनांक 21 ऑगस्ट, 2017 च्या आकृतीबंधानुसार भरती व पदोन्नती आणि पदस्थापना तातडीने करणे. | 16<br>फेब्रुवारी | 200<br>17/02/2018 | मंजूर |
| 6. | **श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 111, नेरूळ नोड-15 मधील सेक्टर 58अे मध्ये कॉँक्रीटीचे नवीन फुटपाथ तयार करणे. | 17<br>फेब्रुवारी | 201<br>17/02/2018 | मंजूर |
| 7. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>भारत सरकारने "पद्मश्री" या पदविने सन्मानित केलेले राज्य सरकारचे "स्वच्छता दूत" असलेले अनेक महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, तसेच अनेक स्वयंसेवी संस्था यांनी सन्मानित केलेले रायगडचे सुपत्र "जेष्ठ निरुपणकार तीर्थरुप डॉ. श्री. दत्तात्रेय नारायण धर्माधिकारी तथा असंख्य अनुयायांचे अप्पासाहेब धर्माधिकारी" यांनी "समर्थ बैठक" या बैठकिच्या माध्यमातून आध्यात्म आणि परमार्थाच्या शिकवणीतून एक आदर्श समाज घडविण्यासाठी तळागाळातील शेवटच्या माणसांपर्यंत समाज प्रबोधन करून स्वातंत्र्य, समता, बंधुभाव प्रत्येक माणसाच्या मनात रुजविला आहे. तसेच देशहित, राष्ट्रप्रेम जपण्याकरिता आपल्या असंख्य अनुयायाच्या योगदानातून "महाराष्ट्र भूषण" स्वर्गीय तीर्थरुप "डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान" या प्रतिष्ठानच्या वतीने स्वच्छता अभियान, आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबीरे, वृक्षरोपन व सवंर्धन, जलपुर्नभरण, शैक्षणिक मार्गदर्शने, बालसंस्कार मार्गदर्शने, पाण पोईंची निर्मीती हे समाजहिताचे कार्य समाजातील तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्याचे बहुमुल्य योगदान कृतीतून केले आहे. तसेच नवी मुंबई महापालिका क्षेत्रात आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान या सारखे सामाजिक उपक्रम आपल्या अनुयायांकडून राबविले आहेत. महाराष्ट्र भूषण स्वर्गीय तीर्थरुप | 18<br>फेब्रुवारी | 202<br>17/02/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी यांनी निकोप समाज घडविण्यासाठी "श्री समर्थ बैठक" सोमवार दि. 10 ऑक्टोबर 1943 रोजी विजया दशमी मुंबई गोरेगाव येथे "पहिली बैठक" आयोजित केली या बैठकीचे "अमृत महोत्सवी वर्ष" (75 वर्षे) सुरु आहे या शुभवर्षाचे औचित्य साधून "तीर्थरुप डॉ. श्री अप्पासाहेब धर्माधिकारी" यांचा नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने "नागरी सन्मान" करुन त्यांचा गौरव करण्यात यावा व "नागरी सन्मान" सत्कार सोहळयास नवी मुंबईतील जनतेला व त्यांच्या असंख्य अनुयायांना सहभागी होता यावे अशा प्रकारे या सोहळयाचे आयोजन करणे. | | | |
| 8. | **श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-**<br>सी.बी.डी. से. 9 मधिल पिपल्स हायस्कुलच्या मागील बाजुच्या मैदानाची दुरूस्ती व सुशोभिकरण करणे. | 22<br>फेब्रुवारी | 203<br>17/02/2018 | मंजूर |
| 9. | **श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-**<br>"सी.बी.डी. से.9 मधिल डॉ. बळीराम हेगडेवार(मँगो गार्डन) मधे असलेल्या पाँडमध्ये कांरजे बसवून पाँडचे सुशोभिकरण करणे. | 23<br>फेब्रुवारी | 204<br>17/02/2018 | मंजूर |
| 10 | **श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-**<br>सी.बी.डी. से. 9 मधिल सदगुरु सोसायटी ते एकता उदयानापर्यंतच्या गटाराची दुरुस्ती करणे. | 24<br>फेब्रुवारी | 205<br>17/02/2018 | मंजूर |
| 11 | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**<br>सुप्रिम कोर्टचे सिव्हील अपील क्रं. 6454/2011 या याचिकेवर न्यायाधिशांनी दिलेल्या निर्णयास अनुसरुन असे सुचवू इच्छितो की, नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयात वारंवार माहिती अधिकारात माहिती अधिकार कार्यकर्ते विविध विषयांची / महापालिकेशी संबंधित कामकाजाची माहिती मागवत असतात. त्यांच्यामुळे महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांना तसेच नागरी विकास कामांना खोडा घातला जात आहे. अशा माहिती अधिकार कार्यकत्यांच्या उपद्रवांमुळे महापालिकेच्या विकास कामात अडथळा येत आहे, शासकीय कार्यालयास वेठीस धरले जात आहे. अशा घातक प्रवृत्तीच्या व्यक्तींमुळे माहिती अधिकार कायदयाच्या मूळ उददेशाला धोका पोहचत आहे तसेच माहिती अधिकार कायदयाच्या अशा गैरवापरामुळे शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या मनात एका चांगल्या व पारदर्शक कायदयाबदद्ल नकारात्मक भावना उत्पन्न होत आहे. तरी माहिती अधिकार कायदया बदद्ल सकारात्मक भावना रुजण्यासाठी व त्याचा दुरूपयोग करणा-या घटकांना वेळीच आळा घालणे आवश्यक व काळाची गरज आहे. तरी सुप्रिम कोर्टचे सिव्हील अपील क्रं. 6454/2011 च्या निर्णयानुसार जे माहिती अधिकार कार्यकर्ते माहिती अधिकारात माहिती मागवून महापालिकेला/शासकीय यंत्रणेला वेठीस धरत असतील व नागरी विकासकामांमध्ये अडथळा निर्माण करत असतील अशा माहिती अधिकार व अर्जदारांना महापालिकेने काळया यादीत टाकून त्यांच्या अपीलांची सुनावणी घेवू नये. | 25<br>फेब्रुवारी | 206<br>17/02/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**<br>मी प्रतिनिधित्व करत असलेल्या प्रभाग क्र. 61 सेक्टर 9, वाशी, नवी मुंबई येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदयानाच्या प्रवेशद्वारावर बौध्दस्तुप कमान उभारण्यात यावी अशी येथील आंबेडकर अनुयायी जनतेची मागणी आहे. त्यानुसार आपण सदर ठिकाणी बौध्दस्तुप कमान उभारणे. | 26<br>फेब्रुवारी | 207<br>17/02/2018 | मंजूर |
| 13 | **श्रीम. दिपा राजेश गवते, यांजकडून :-**<br>गणपतीपाडा पेट्रोलपंप शेजारी RCC नाला बांधून त्यास लोखंडी Ralling बसविणे. | 30<br>फेब्रुवारी | 208<br>17/02/2018 | मंजूर |
| 14 | **श्रीम. दिपा राजेश गवते, यांजकडून :-**<br>गणपतीपाडा, आंबेडकर नगर गणेश नगर, दुर्गानगर, सावित्री नगर, महात्मा फुले नगर व बिंदुमाधव नगर येथे मलनिसा:रण वाहीन्या टाकणे. | 31<br>फेब्रुवारी | 209<br>17/02/2018 | मंजूर |
| 15 | **श्रीम. दिपा राजेश गवते, यांजकडून :-**<br>बिंदू माधव नगर येथे HOLDING POND बांधणे. | 32<br>फेब्रुवारी | 210<br>17/02/2018 | मंजूर |
| 16 | **श्रीम. सीमा चिंतामण गायकवाड यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 31, मधील समर्थ नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 36<br>फेब्रुवारी | 211<br>17/02/2018 | मंजूर |
| 17 | **श्रीम. सीमा चिंतामण गायकवाड यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 31 मधील राम मंदिर ते गुणाली तलाव या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 37<br>फेब्रुवारी | 212<br>17/02/2018 | मंजूर |
| 18 | **श्रीम. सीमा चिंतामण गायकवाड यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 31, मध्ये समर्थ नगर मधील विश्वनाथ म्हात्रे यांच्या घराजवळील गटर दुरुस्ती करणे. | 38<br>फेब्रुवारी | 213<br>17/02/2018 | मंजूर |
| 19 | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, मधील से. 03 येथील जुने विदयुत दिवे बदलून नविन एल.ई.डी. दिवे बसविणे. | 39<br>फेब्रुवारी | 214<br>17/02/2018 | मंजूर |
| 20 | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, मधील मधील कोपरखैरणे विभाग कार्यालयाच्या मागील बाजूस निवारा शेड बनविणे. | 40<br>फेब्रुवारी | 215<br>17/02/2018 | मंजूर |
| 21 | **श्रीम. संगिता संदिप म्हात्रे यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 45, मधील से. 03, 6 व 7 च्या मुख्य रस्त्यावरील पदपथांची दुरुस्ती करणे. | 41<br>फेब्रुवारी | 216<br>17/02/2018 | मंजूर |
| 22 | **श्री. विलास रामदास भोईर यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 57 मधील आरेंजा सर्कल ते पोलीस वाहतूक चौकी(एपीएमसी) पर्यंतच्या नाल्याची पुर्नबांधणी करणे. | 42<br>फेब्रुवारी | 217<br>17/02/2018 | मंजूर |
| 23 | **श्री. विलास रामदास भोईर यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 57 तुर्भे गावात प्रवेश रस्त्यावर पनवेल मुंबई हायवेच्या बाजूला पेट्रोल पंप व हॉटेल आर्पेटाइट मधील रस्त्यास सिमेंट कॉक्रीट ची कमान बांधणे. | 43<br>फेब्रुवारी | 218<br>17/02/2018 | मंजूर |
| 24 | **श्री. विलास रामदास भोईर यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 57 मधील भूखंड क्र. 3-1 सेक्टर 18 (मॅफको) तुर्भे नवी मुंबई हा भूखंड जनहितास्तव आरक्षित ठेवण्यात यावा. तसेच सदर भूखंड सार्वजनिक मैदानासाठी सिडको कडून त्वरित हस्तांतरित करुन घेण्याची कार्यवाही करणे. | 44<br>फेब्रुवारी | 219<br>17/02/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 25 | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी यांजकडून :-**<br>"नमुमपा च्या संपुर्ण कारभारातुन छपाईसाठी A5 (फुलस्केप) साईजच्या वापरल्या जाणा-या सर्व कागदांचा वापर बंद करुन त्या ऐवजी A4 (लेटर) साईजच्या कागदांचा वापर केल्यामुळे विनाकारण वाया जाणारे कागद थांबवावे त्याच प्रमाणे राज्य सरकारने अंगिकारल्या प्रमाणे कागदाचा पाठपोठ वापर करुन कागदाचा कमीत कमी वापर करावा तसेच घरोघरी व कार्यालयात असलेल्या व परवडणाऱ्या 80 कॉलम प्रिंटरमधुन गरजेच्यावेळी झेरॉक्स सोय होऊन झेरॉक्ससाठी लागणारा वेळ व खर्च वाचवण्याच्यासाठी व नगरसेवकांना महासभेचे वृतांत व प्रश्नोत्तरांच्या भरमसाठ कागदांचे वागवावे लागणारे अर्धे ओझे कमी करण्यासाठी व पर्यावरणाचे हित जपण्यासाठी A5 कागदांचा वापर ताबोडतोब थांबविणे. | 56<br>फेब्रुवारी | 220<br>17/02/2018 | मंजूर |
| 26 | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी यांजकडून :-**<br>नमुमपा च्या पत्रव्यवहारात लिलिल्या जाणा-या जावक क्रमांकांची रचना बदलुन जावक क्रमांक लिहिण्यासाठी जी मध्ये जागा सोडतात ती शेवटी सोडण्यात यावी जेणे करुन कमी जागा सोडलेली असताना लिपिकांना जावक क्रमांक मध्ये लिहीताना अडचण होते ती होणार नाही व वाचणारालाही शेवटी लिहीला जाणारा जावक क्रमांक नीट वाचता येईल त्यासाठी पालिकेच्या पत्रात हाताने लिहिली जाणारा जावक क्रमांक शेवटी लिहिणे. (उदा : नमुंमपा/कनिस/बिविने/1916/2017 हा जावक क्र. नमुंमपा/कनिस/बिविने/ 2017/1196), | 57<br>फेब्रुवारी | 221<br>17/02/2018 | मंजूर |
| 27 | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार यांजकडून :-**<br>शिरवणे गाव येथील पाणी पुरवठा सुरळीत करणेकरीता उच्चस्तरीय जलकुंभ बांधणे. | 64<br>फेब्रुवारी | 222<br>17/02/2018 | मंजूर |
| 28 | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>सानपाडा सेक्टर 08 येथील बाबू गेनू मैदान लगतचे शौचालय अपुरे असल्याने येथील लगतच्या पोलिस स्टेशनमधील कर्मचारी पोलिस यांची संख्या 40 च्या वर आहे तसेच रस्त्यावरील येणारे जाणारे नागरीकांची वर्दळ ही जास्त प्रमाणात आहे व मैदानात अखंड हरीनाम सप्ताहसारखे कार्यक्रम होत असतात त्यासाठी मैदानात 4000/5000 भक्त जमत असतात. त्यामुळे सदरचे शौचालय पुरेशे नाही व Unhygenic आहे. त्या दृष्टीने मोठे व अदयावत (1+1) बनविणे. | 68<br>फेब्रुवारी | 223<br>17/02/2018 | मंजूर |
| 29 | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>सानपाडा, सेक्टर 09, भूखंड क्रमांक 03 येथे 14000 चौ. स्के. मी. चे मैदान असून येथिल 14 वयोगटाखालील मुले MCA मध्ये खेळतात. तसा येथे क्रिडा प्रशिक्षण केद्र बांधण्यात यावे असा ठराव केलेला आहे. परंतु या क्रिडा प्रशिक्षण बांधकाम केंद्रात जल-तरण तलावाचाही समावेश असावा तसेच या मैदानात विविध खेळासाठी तरतूद करणे. | 69<br>फेब्रुवारी | 224<br>17/02/2018 | मंजूर |
| 30 | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>सानपाडा, सेक्टर 11, भूखंड क्रमांक 01 येथे आधुनिक वाचनालय बनविण्यात यावे यासाठी लवकरात लवकर वास्तुविशारद यांची नेमणूक करुन कामाला गती देणे. | 70<br>फेब्रुवारी | 225<br>17/02/2018 | मंजूर |

| | |
|---|---|
| तां.का. क्र. 48<br>दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | **क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा ठराव**<br>सेक्टर-19, नेरूळ येथील कै.यशवंतराव चव्हाण क्रिडांगणातील फुटबॉल मैदान वापराचे धोरण व भाडेशुल्क दर निश्चित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रीडा व सांस्कृ./44/2018. |
| ठराव क्र. 226.<br>दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशिलवार दिल्याप्रमाणे, नेरूळ सेक्टर-19 नेरुळ येथील कै. यशवंतराव चव्हाण क्रीडांगणीतील फुटबॉल मैदान वापराचे धोरण व भाडेशुल्क दर निश्चित करण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाब क्रमांक 15 मधील मैदान वापराचे दिनांक, वेळ आणि भाडे याबाबत कोणत्याही स्वरुपाचे बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असतील त्या ऐवजी मा. महानगरपालिकेस अधिकार असावे असे नमूद करण्यात यावे. सदर मैदानाचे चार भागामध्ये विभाजन करण्यात यावे. तसेच सुधारीत अट क्रमांक 21 नव्याने समाविष्ट करुन त्यामध्ये महापालिका क्षेत्राबाहेरील संस्था, शाळा, महाविद्यालये यांकरीता प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या अटी, शर्ती व दराप्रमाणे रक्कम स्वीकारण्यास येईल आणि नवी मुंबई क्षेत्रातील शाळा, महाविद्यालये, संस्था याकरीता क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीने सुचविल्याप्रमाणे दर आकारण्यास तसेच नमुंमपा नेरुळ, से.19 येथील कै. यशवंतराव चव्हाण क्रीडांगणातील फुटबॉल मैदान वापराबाबतचे प्रस्तावित भाडेशुल्क दरपत्रकामध्ये क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीने **<u>परिशिष्ट अ</u>** प्रमाणे केलेली शिफारशीसह मंजूरी देण्यात यावी." |
| निर्णय | **मंजूर.** |
| तां.का. क्र. 49<br>दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | **क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा ठराव**<br>सी.बी.डी. सेक्टर-3, येथील भारतरत्न स्व.राजीव गांधी क्रीडा संकुलातील मैदान वापराकरीता सुधारित धोरण व दर निश्चित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/01/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रीडा व सांस्कृ./45/2018. |
| ठराव क्र. 227.<br>दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशीलवार दिल्याप्रमाणे, सी.बी.डी. सेक्टर-3, येथील भारतरत्न स्व.राजीव गांधी क्रीडा संकूलातील मैदान वापराकरीता सुधारीत धोरण व दर निश्चित करणेच्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाब क्रमांक 8 मधील मैदान वापराचे दिनांक, वेळ आणि भाडे याबाबत कोणत्याही स्वरुपाचे बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असतील त्या ऐवजी मा. महानगरपालिकेस अधिकार असावेत असे नमूद करण्यात यावे. सुधारीत अट क्रमांक 24 नव्याने समाविष्ट करुन त्यामध्ये भारतरत्न स्व. राजीव गांधी क्रीडा संकुलातील मैदान 60 दिवस आधी आरक्षित (Booking) करणे बंधनकारक आहे, सुधारीत अट क्रमांक 25 नव्याने समाविष्ट करुन त्यामध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार 65 डेसीबल्स इतक्या क्षमतेचे वाजवण्याबाबत ध्वनीवर्धकास परवानगी देण्यात यावी, तसेच नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा संकूलातील मैदान वापराबाबतचे सुधारीत भाडेशुल्क दरपत्रकामध्ये क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीने **<u>परिशिष्ट अ</u>** प्रमाणे केलेली शिफारशीसह मंजूरी देण्यात यावी." |
| निर्णय | **मंजूर.** |
| तां.का. क्र. 50<br>दि.17 फेब्रुवारी 2018 | श्वानदंश लस खरेदी करणे करीता प्रशासकिय मान्यता मिळणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/931/2018. |
| ठराव क्र. 228.<br>दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | "नवी मुंबई महानगरपालिका रूग्णालयांमध्ये श्वानदंश उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांवर वैदयकिय उपचार करणेसाठी अंदाजे 50200 डोसेस/लस खरेदी करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 1 कोटी, 20 लाख, 91 हजार 674 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **तां.का. क्र. 51**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | कोपरखैरणे सेक्टर 16 भूखंड क्र. 38 येथे नागरी आरोग्य केंद्र बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 15/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./271/2018. |
| **ठराव क्र. 229.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "कोपरखैरणे सेक्टर 16 भुखड क्र. 38 येथे नागरी आरोग्य केंद्र बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 2 कोटी, 67 लाख, 59 हजार 391 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **तां.का. क्र. 52**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | वाशी से-3 येथील भूखंड क्र. 17 सी व भूखंड क्र. 9 (ई.एस.आर) भूखंड क्र. 6/1 ते 8/17, भूखंड क्र. 8/11 ते 8/14 समोरील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 15/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./272/2018. |
| **ठराव क्र. 230.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "वाशी से-3 येथील भुखंड क्र. 17 सी व भुखंड क्र. 9 (ई.एस.आर) भुखंड क्र.6/1 ते 8/17, भुखंड क्र.8/11 ते 8/14 समोरील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 30 लाख, 31 हजार 290 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर.** |
| **तां.का. क्र. 53**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | **स्थायी समितीचा शुक्रवार, दिनांक 16 फेब्रुवारी 2018 चा ठराव क्र. 283**<br>सन 2018-19 या वर्षाकरीता मालमत्ता कराचे दर ठरविणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 06/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/कनिसं/350/2018. |
| **ठराव क्र. 231.**<br>**दिनांक 17 फेब्रुवारी 2018** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील निवासी, अनिवासी व औद्योगिक मालमत्ता संबंधात सन 2018-2019 या शासकीय वर्षाकरीता खालील तक्त्यामध्ये तपशीलवार दिलेल्या दराने मालमत्ता कर, वृक्षकर इत्यादी आकारण्यास, तसेच करदात्यांसाठी अभय योजना राबविणेसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 99 अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजूरी देण्यात यावी." |

| अ. क्र. | कराचा प्रकार | प्रस्तावित दर | | |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | अनिवासी | औद्योगिक |
| 1 | सामान्य कर (0.5% अग्निशमन करासहीत) | 23.50% | 32.50% | 34.50% |
| 2 | जल लाभ कर | 1.00% | 4.00% | 3.00% |
| 3 | साफसफाई कर / मलनि:स्सारण कर | 3.00% | 7.00% | 0.00% |
| 4 | मलनि:स्सारण लाभ कर | 1.00% | 2.00% | 3.00% |
| 5 | महापालिका शिक्षण कर | 1.00% | 4.00% | 4.00% |
| 6 | पथ कर | 2.67% | 3.33% | 8.33% |
| 7 | वृक्ष कर | 0.50% | 0.50% | 0.50% |
| | **एकूण** | **32.67%** | **53.33%** | **53.33%** |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| तां.का. क्र. 54 दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | वाशी विभागातील से.29 येथील नमुंमपा पाणी टाकी जवळ आर.सी.सी. स्ट्रॉर्म वॉटर ड्रेन बांधणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./286/2018. |
| ठराव क्र. 232. दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | "वाशी विभागातील से.29 येथील नमुंमपा पाणी टाकी जवळ आर.सी.सी. स्ट्रॉर्म वॉटस ड्रेन बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 1 कोटी, 65 लाख, 08 हजार 379 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय | मंजूर. |
| तां.का. क्र. 55. दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात खोदकाम परवानगी देताना आकारावयाच्या शुल्काच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./287/2018. |
| ठराव क्र. 233. दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात खोदकाम परवानगी देताना आकारावयाच्या शुल्काबाबतच्या प्रस्तावातील तक्त्यात बाब क्र. 1 ते 5 मध्ये नमुद प्रस्तावित दरास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय | मंजूर. |
| तां.का. क्र. 56. दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | तुर्भे विभागातील सानपाडा सेक्टर 14 भु.क्र. 20 येथे दैनंदिन बाजार विकसित करणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./292/2018. |
| ठराव क्र. 234. दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | "तुर्भे विभागातील सानपाडा सेक्टर 14 भु. क्र. 20 येथे दैनंदिन बाजार विकसित करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, एकूण रक्कम रु. 1 कोटी, 86 लाख, 34 हजार 453 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय | मंजूर. |
| तां.का. क्र. 57. दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | मे. दत्तगुरू सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, भूखंड क्र. 16, सेक्टर 6 नेरूळ येथील इमारत क्र.ए-1 व ए-2 च्या पुर्नबांधणीच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/02/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/514/2018. |
| ठराव क्र. 235. दिनांक 17 फेब्रुवारी 2018 | "मे. दत्तगुरु सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, भुखंड क्र. 16, सेक्टर 6, नेरुळ येथील इमारत क्र.ए-1 व ए-2 च्या पुर्नबांधणीस, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय | मंजूर. |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**